# सातारा जिल्हा परिषद, सातारा
## सामान्य प्रशासन विभाग

कार्यालयाचा पत्ता : जिल्हा परिषद मुख्य इमारत, ४ था मजला, सातारा-कोरेगांव रोड, सदर बझार कँप ता.जि.सातारा.
कार्यालय दुरध्वनी क्रं ०२१६२-२९५०५३ Email- dyceogadstr@gmail.com


## सातारा जिल्हा परिषद, सातारा
## जाहिर आवाहन

जिल्हा परिषदेमध्ये दररोज मोठ्या संख्येने सामान्य नागरिक विविध शासकीय कामकाजाकरिता भेट देत असतात. नागरिकांच्या कामकाजात प्रामाणिकता, पारदर्शकता आणि वेग आवश्यक आहे. काही अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून नागरिकांकडून आर्थिक मागणी केल्याची प्रकरणे अधूनमधून निदर्शनास येत आहेत, जे अत्यंत दुर्दैवी आहे. अशा गैरप्रकारांमुळे केवळ संबंधित कर्मचाऱ्यांचीच नव्हे, तर संपूर्ण जिल्हा परिषदेची प्रतिमा मलिन होत आहे.जिल्हा परिषदेचे प्रशासन अशा प्रकारच्या भ्रष्ट वर्तनाविरुद्ध शून्य सहनशीलतेची भूमिका घेत असून, कोणत्याही प्रकारच्या लाचलुचपत किंवा आर्थिक व्यवहाराला अजिबात स्थान देण्यात येणार नाही.

सर्व कर्मचारी वर्ग व नागरिकांना सूचित करण्यात येते की, जिल्हा परिषद व अंतर्गत सर्व कार्यालयांमध्ये कोणत्याही प्रकारची **लाच, आर्थिक लाभ किंवा कोणत्याही स्वरूपातील अनुचित फायदा** घेणे अथवा देणे **कठोरपणे प्रतिबंधित** आहे.

" **लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, १९८८** (**The Prevention of Corruption Act**, 1988)" नुसार अशा कृतींना गुन्हा मानला जातो आणि संबंधितांवर कायदेशीर कारवाई होऊ शकते.

जिल्हा परिषद व अंतर्गत सर्व कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी **स्वच्छता, पारदर्शकता, नीतिमत्ता आणि प्रामाणिकपणा** या तत्त्वांचे पालन करावे, व कोणत्याही परिस्थितीत लाच घेणे किंवा देणे टाळावे.

तसेच सर्व नागरिकांना **जाहीर आवाहन** करण्यात येते की,जर कोणत्याही शासकीय कामाच्या निमित्ताने जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती अंतर्गत अधिकारी/कर्मचारी यांनी लाच मागणी केल्यास संबंधित नागरिकांनी सक्षम पुराव्यांसह तत्काळ खालील अधिकाऱ्यांशी संपर्क साधावाः

**कार्यालय प्रमुख**:
नावः याशनी नागराजन (भा.प्र.से)
पदनामः मुख्य कार्यकारी अधिकारी
कार्यालयाचा पत्ताः सातारा जिल्हा परिषद, सातारा
Email - ceozpstr@gmail.com

चला, आपण सर्व मिळून " **भ्रष्टाचारमुक्त भारत** " घडविण्याचा संकल्प करूया.

प्राप्त तक्रारींवर त्वरित तपास करून जबाबदार अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुद्ध प्रचलित नियमांनुसार कठोर कारवाई करण्यात येईल.

जिल्हा परिषद सातारा आपल्या कार्यपद्धतीत पारदर्शकता, प्रामाणिकता आणि नागरिकाभिमुख प्रशासन या मूल्यांवर ठाम आहे. नागरिकांचा विश्वास अबाधित राखणे हीच जिल्हा परिषदेची सर्वोच्च प्राधान्याची बाब आहे.

**स्वाक्षरी/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**सातारा जिल्हा परिषद, सातारा**